# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
# (वीज दराच्या अटी व शर्ती) (सुधारणा) विनियम, २०११

विद्युत अधिनियम, २००३

क्र. एमईआरसी/लिंगल/सु./२७१०/२०७४ महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, विद्युत अधिनियम, २००३ (२००३ चा ३६) च्या कलम १८१ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि या संदर्भात आयोगास समर्थ करणाऱ्या अन्य सर्व अधिकारांचा वापर करुन याद्वारे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीज दराच्या अटी व शर्ती) विनियम,२००५ मध्ये खालील सुधारणा करीत आहे **:-**

**१. संक्षिप्त शीर्षक आणि प्रारंभ :-**

(१) या सुधारणांना महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीज दराच्या अटी व शर्ती) (सुधारणा) विनियम, २०११, असे म्हणावे.

(२) या सुधारणा शासकीय राजपत्रातील त्यांच्या प्रसिध्दीच्या दिनांकापासून अंमलात येतील.

**२. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीज दराच्या अटी व शर्ती) विनियम, २००५ (ज्यास येथून पुढे "वीज दर विनियम" म्हणून संबोधण्यात येईल) च्या विनियम ८२ मध्ये सुधारणा**

(एक) वीज दर विनियमांच्या विनियम ८२.६ ऐवजी, खालील विनियम दाखल करण्यात येईल:-

"८२.६ विशिष्ट वीज ग्राहकांची वर्गवारी / उप-वर्गवारी / वीज वापराच्या टप्प्याचा मासिक इंधन समायोजन आकार (एफएसी) त्या वीज ग्राहकांची वर्गवारी / उप-वर्गवारी / वीज वापराच्या टप्प्याच्या वीज दराच्या अस्थिर भागाच्या १० टक्क्यांपेक्षा, किंवा आयोगाकडून वेळोवेळी विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा अन्य कमाल मर्यादेपेक्षा, जादा असणार नाही.

परंतु असे की, उपरोक्त मर्यादेपेक्षा जादा इंधन समायोजन आकार, वितरण परवानाधारकाकडून पुढे नेण्यात येईल आणि आयोग भविष्यात निर्देश देईल त्या कालावधीत त्याची वसुली करण्यात येईल.

परंतु आणखी असे की, मीटर नसलेल्या ग्राहकांच्या बाबतीत, इंधन समायोजन आकाराच्या मर्यादेची परिगणना, त्याच वीज ग्राहकाच्या

वर्गवारीतील मीटर असलेल्या उप-वर्गवारीच्या इंधन समायोजन आकाराच्या मर्यादेला, मीटर नसलेल्या व मीटर असलेल्या उप-वर्गवारीच्या सरासरी आकारणीच्या दराच्या गुणोत्तराने गुणून, करण्यात येईल.

(दोन्) वीज दर विनियमांच्या विनियम ८२.१० ऐवजी, खालील विनियम दाखल करण्यात येईलः-

"८२.१० विशिष्ट वर्गवारीकरिता प्रति युनिट इंधन समायोजन आकाराची परिगणना खालील सूत्राप्रमाणे करण्यात येईल :

$FAC_{Cat}$ Rs/kWh = (इंधन समायोजन आकार / (मीटर असलेल्या ग्राहकाकरिता विजेची विक्री + मीटर नसलेल्या वीज वापराचा अंदाज + जादा वितरण हानि)) *K* १०

जेथे

$FAC_{Cat}$ = विशिष्ट वीज ग्राहक वर्गवारी / उप-वर्गवारी / वीज वापराचा टप्पा, याकरिता "रुपये प्रति युनिट"मध्ये दाखविलेला "इंधन समायोजन आकार."

K = ऊर्जा आकार / वीज पुरवठ्याचा सरासरी खर्च.

जेथे:

ऊर्जा आकार = विचाराधीन असलेल्या विशिष्ट वीज ग्राहक वर्गवारी / उप-वर्गवारी / वीज वापराचा टप्पा याकरिता, आयोगाने वीज दर आदेशामध्ये मान्यता दिल्यानुसार "रुपये प्रति युनिट" मधील "ऊर्जा आकार"

वीज पुरवठ्याचा सरासरी खर्च = वीज दर आदेशामध्ये आयोगाने वसुलीसाठी मान्यता दिलेला "रुपये प्रति युनिट"मधील वीज पुरवठ्याचा सरासरी खर्च

आयोगाच्या आदेशावरुन,

**(के.एन. खवारे)**
**सचिव, मविनिआ**

**मुंबई**
**२८ जानेवारी, २०११**